466

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग,निर्णय क्र. संकीर्ण-३६१६ / प्र.क्र.८१ / भाग-४ / E-८११६२४/ पोल-३, दि.१०.१२.२०२४

**विषय :-** राज्यातील सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता निधी वितरित करण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन,गृह विभाग,निर्णय क्र. संकीर्ण-३६१६ / प्र.क्र.८१ / भाग-४ / E-८११६२४ / पोल-३, दि.१०.१२.२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१०१२३७४९९०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक(नि.व स.),महाराष्ट्र राज्य,मुंबई.

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे.

सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व स.),महाराष्ट्र राज्य,मुंबई

कार्यासन अधिकारी, का.क्र.१७

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता निधी वितरित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-३६१६/प्र.क्र.८१/भाग-४/E-८११६२४/पोल-३**

मंत्रालय, २ रा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १०.१२.२०२४

**वाचा** :- १) शासन निर्णय गृह विभाग, क्रमांक एमआयएस ०५०८/७४८/प्र.क्र.३२९/पोल-४, दि.२२.०५.२००९.

२) महाराष्ट्र शासन आणि मे.विप्रो लि.यांचे दरम्यान दि.२२.३.२०१२ रोजी झालेला करारनामा.

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२, दि..१५.४.२०१५.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील SEC (State Empowered Committee) समितीच्या दि.४.७.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील दि.१२.७.२०१६ व दि.२८.१२.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

६) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.१७.१.२०१७, दि.२०.७.२०२०, दि.१८.५.२०२१, दि.१६.११.२०२१, दि.१०.५.२०२२, दि.४.११.२०२२, दि.१२.७.२०२३, व दि.२१.९.२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

७) शासन निर्णय, गृह विभाग क्र.-सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-३/पोल-३, दि.१.७.२०२२, दि.२१.७.२०२३, दि.२१.७.२०२३ व दि.८.१.२०२४.

८) शासन निर्णय, गृह विभाग क्र.-सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.९०/भाग-५/पोल-३, दि.२९.८.२०२३.

९) शासन निर्णय, गृह विभाग क्र.-सीसीटीएनएस-३६१५/प्र.क्र.२०२/भाग-५/पोल-३, दि.९.५.२०२२, दि.१३.१.२०२३ व दि.२९.८.२०२३.

१०) अपर पोलीस महासंचालक (गुन्हे अन्वेषण विभाग) पुणे यांचे मे. डिलाईट कंपनीला दिलेले क्र. No.:CID/SCRB/CCTNS/९०२/२०२३,Pune दि.८.११.२०२३ चे कार्यादेश.

११) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/सीसीटीएनएस प्रकल्प/१५/२०१० दि.१.१२.२०२३.

१२) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/CCTNS/१५/२०१० दि.२५.६.२०२४. (E-7082903)

१३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दि.१.४.२०२४.

<u>प्रस्तावना</u> :-

सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टम इंटीग्रेटर मे.विप्रो लि. या कंपनी बरोबर दि.२२.०३.२०१२ रोजी पाच वर्षांसाठी सेवा करार करण्यात आला. सदर कराराची मुदत दि.१४.०९.२०२० रोजी संपुष्टात आली होती. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समितीच्या दि.२०.०७.२०२० रोजीच्या बैठकीत मे. विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२० ते दि.१४.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग दि.०९.०५.२०२२ अन्वये मे.विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२१ ते दि.१४.०९.२०२२ पर्यंत

रु.९,५१,४३,८५०/- इतक्या रकमेच्या खर्चासह मुदतवाढीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. तद्नंतर शासन निर्णय, गृह विभाग दि.१३.०१.२०२३ अन्वये मे. विप्रो लि. यांना दि.१५.०९.२०२२ ते दि.१४.०९.२०२३ पर्यंत किंवा नवीन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत, जे अगोदर घडेल तोपर्यंत जीएसटी करासहीत रु.९,९५,९२,०००/- इतक्या रकमेच्या खर्चासह मुदतवाढीस प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

२. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.०५.२०२१ रोजीच्या राज्यस्तरीय ॲपेक्स समितीच्या (SAC) बैठकीत सीसीटीएनएस ॲप्लीकेशन GeM पोर्टलवरील क्लाऊड सर्व्हिस घेण्याकरिता ३ महिन्यांसाठी (जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१) मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच राज्यस्तरीय ॲपेक्स समितीच्या (SAC) दि.१०.०५.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय, गृह विभाग दि.१.७.२०२२ अन्वये सध्याचे क्लाऊड सर्व्हिस प्रोव्हायडर मे. सिफी टेक्नोलॉजी लि. यांना ऑक्टोबर २०२१ पासून CCTNS २.० RFP च्या नवीन सर्व्हिस प्रोव्हायडर यांची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता रु.५४.१७ कोटी इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. दि.२९.८.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सीसीटीएनएस प्रकल्पासाठी सन २०२३-२४ करिता रु.१३०,७४,५४,७५३/- इतक्या खर्चास मान्यता देण्याबाबत तसेच सीसीटीएनएस प्रकल्पाचे पुरवठादार मे.विप्रो लि.या कंपनीला विशेष बाब म्हणून सीसीटीएनएस २.० RFP मार्फत नविन पुरवठादारास प्रकल्पाचे काम हस्तांतरीत करेपर्यंत मुदतवाढ देणे इत्यादीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तद्नंतर सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टीम इंटिग्रेटर मे. विप्रो यांचा सीसीटीएनएस १.० चा कालावधी दि.१४.९.२०२३ रोजी संपल्याने दि.२१.९.२०२३ रोजी मा. मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य शिखर समिती (SAC) च्या बैठकीमध्ये मे. डिलॉईट कंपनीस (M/s. Deloitte) सीसीटीएनएस १.० प्रकल्पाचे परिचलन व देखभाल (Operation & Maintenance) करण्यासाठी नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मे. डिलॉईट कंपनीस (M/s. Deloitte) एक वर्षाकरीता सीसीटीएनएस १.० Operation and Maintenance करण्यासाठी रु.७,३९,८६,०००/- (जीएसटीसह) इतक्या रक्कमेच्या खर्चास तसेच M/s. Deloitte यांचे सोबत करावयाच्या मुख्य सेवा करार (Master Service Agreement) (M.S.A.) चा मसुदा पोलीस महासंचालक कार्यालयाचे स्तरावर करण्यास दि.८.१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात आली आहे.

३. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी संदर्भ क्रमांक. १२ दिनांक २५.६.२०२४ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टीम इंटीग्रेटर M/s. Deloitte यांनी O&M for CCTNS १.० (Period १.१२.२०२३ ते २९.२.२०२४) असे तीन महिन्यांचे एकूण रु.१,८४,९६,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी चौऱ्याऐंशी लाख शहाण्णव हजार पाचशे फक्त) जीएसटीसह इतकी रक्कम वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** :

सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, दुरुस्ती व इतर आवश्यक बाबींकरिता सीसीटीएनएस प्रकल्पाचे सिस्टीम इंटीग्रेटर M/s. Deloitte यांनी O&M for CCTNS १.० (Period १.१२.२०२३ ते २९.२.२०२४) असे तीन महिन्यांचे एकूण रु.१,८४,९६,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी चौऱ्याऐंशी लाख शहाण्णव हजार पाचशे फक्त) जीएसटीसह इतकी रक्कम वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. सीसीटीएनएस प्रकल्पाच्या देखभाल, व दुरुस्तीसाठी व इतर आवश्यक बाबींसाठी येणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९ जिल्हा पोलीस, (००) १४ गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (राज्य योजना), दत्तमत, (२०५५ए०९७), ५०- इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उक्त निधी कोषागारातून आहरण करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" व त्यांच्या अधिपत्याखालील आहरण व संवितरण अधिकाऱ्याला "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. उपरोक्त निधी सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या कामासाठी केंद्र शासनाच्या निदेशानुसार खर्च करण्यात यावा व खर्च करण्यात आलेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शिखर समितीच्या (SAC) दिनांक २१.९.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.६७६/२०२४/व्यय-७, दि.५.१२.२०२४ अन्वये निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२१०१२३७४९९०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc430443efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2024.12.10 15:25:37 +05'30'

**( रुपाली कबरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अभिलेख कक्ष, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

१३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१४. प्रकल्प संचालक, मे. डलॉइट LLP, मुंबई.
१५. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१६. कक्ष अधिकारी, अर्थ-१, गृह विभाग.
१७. निवडनस्ती, पोल-३.